महापालिका आयुक्त कार्यालय
पुणे महानगरपालिका, मुख्य इमारत
शिवाजी नगर पुणे - ४११००५
Email id : mco@punecorporation.org
फोन क्र. ०२०- २५५०११००
जावक क्र. मआ/साप्रवि/२३९४
दिनांक : १३ /०७/२०२०

प्रति,
सर्व औद्योगिक आस्थापना
पुणे महानगरपालिका क्षेत्र.

विषय – लॉकडाऊन कालावधीमध्ये कर्मचाऱ्यांना कंपनी मध्ये येणे व जाणे करिता वाहन पास देणेबाबत.

संदर्भ :- या कार्यालयाचे आदेश क्र. जा.क्र.मआ/साप्रवि/२३६१ दि. १२/०७/२०२०

साथरोग अधिनियम, १८९७ अंतर्गत, राज्यात कोरोना विषाणूमुळे उद्भवलेल्या कोविड-१९ संसर्गजन्य रोगाचा प्रतिबंध व नियंत्रण करण्यासाठी महाराष्ट्रात कोविड-१९ उपाययोजना नियम-२०२० अंमलात आलेले आहेत. कोरोना विषाणूमुळे पसरत असलेल्या आजाराला प्रतिबंध करणेसाठी पुणे पोलीस आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रात फौजदारी दंड प्रक्रीया संहिता सन १९७३ कलम १४४ (१) (३) प्रमाणे जमावबंदी, संचारबंदीचे आदेश लागू केलेला आहे. पुणे महानगरपालिकेने लागू केलेला लॉकडाउन संदर्भीय आदेशान्वये दिनांक १४ जुलै २०२० ते २३ जुलै २०२० पर्यंत लागू करणेत आलेला आहे.

वरिल संदर्भीय पत्रानुसार आपल्या कंपनीमधील कर्मचाऱ्यांना कंपनी मध्ये येणे व जाणे करिता वाहन पास देणेकामी आपल्या कंपनीच्या एचआर किंवा संबंधीत अधिका-यांना खालील अटी व शर्तींवर प्राधिकृत करण्यात येत आहे.

या कार्यालयाचे आदेश क्र. मआ/साप्रवि/ २३६१ दि. १२/०७/२०२० मधील सुचनांचे पालन करणे बंधनकारक आहे.

१) कंपनीमध्ये सदर कर्मचाऱ्यांना प्रवेश देण्यापूर्वी त्यांच्या शरीराचे तापमान तपासून योग्य त्या मर्यादेत असल्यासच प्रवेश द्यावा. सॅनिटायझर, मास्कचा वापर करणे व

सोशल डिस्टन्सिंग ठेवणे तसेच तदनुषंगीक नियम अटींचे पालन करणे संबंधितांना बंधनकारक आहे.

२) कर्मचारी कंटेनमेंट झोन मधून येणार नाहीत याची काळजी कंपनीने घ्यावी. सदर क्षेत्र कंटेनमेंट झोन आहे किंवा नाही याची माहिती घेण्याची जबाबदारी कंपनीची व संबंधित कर्मचाऱ्यांची असेल.

३) सर्व औद्योगिक आस्थापना उक्त कालावधीत सुरू राहतील. सदर अस्थापना मधील कार्यरत अधिकारी / कामगार यांना संबधीत अस्थापनेच्या एच आर विभाग प्रमुख यांनी यासोबतच्या अनुसुची प्रमाणे वाहन परवाना कंपनीच्या लेटरहेड वर निर्गमित करावा. त्या करीता त्यांना प्राधिकृत करणेत येत आहे. कंपनी कडुन निर्गमित करणेत आलेल्या परवान्यांची माहीती संबधीत पोलिस आयुक्त व पोलिस स्टेशन प्रभारी यांना सादर करावी. कंपनी कामगार यांनी कामावर जाताना व परत येताना प्रवासा दरम्याने कंपनिचे ओळखपत्र व कंपनी कडुन पुरविण्यात आलेला वाहन परवाना सोबत ठेवणे बंधनकारक करण्यात येत आहे. तथापी, ज्या औद्योगिक आस्थापनामध्ये कोवीड-१९ चा रूग्ण आढळून आल्यास असा कामगार / अधिकारी कार्यरत असलेल्या युनिट मधिल सर्व कामगारांची कोवीड-१९ ची तपासणी स्वखर्चाने करणे बंधनकारक राहील. दरम्यानच्या कालावधीत संबधित युनिट बंद ठेवण्यात यावे. चाचणी पुर्ण झाल्या नंतर व संबंधित युनिटचे निर्जंतुकीकरण पुर्ण झाल्या नंतरच ते परत कार्यान्वित करावे. प्रतिबंधित क्षेत्राबाहेरील व्यक्तीसच फक्त कामावर उपस्थित राहता येईल.

४) सदरचा वाहन परवाना दिनांक २३ जुलै २०२० पर्यंत वैध असेल. तसेच वरील अटी व शर्तींचे उल्लंघन झाल्यास संबधित कर्मचारी व कंपनीवर नियमाधिन कारवाई केली जाईल. तसेच सदर परवाना तात्काळ रद्द करणेत येईल.

५) कर्मचा-यांना देण्यात येणारा वाहन परवाना कंपनीचे लेटरहेड वरच देण्यात यावा.अन्यथा सदरचा परवाना ग्राह्य धरण्यात येणार नाही.

६) सदरचा पास आपल्या अधिनस्त कर्मचा-यांना दिल्यानंतर पुनःश्च पुणे महानगपालिका, पोलिस आयुक्तालय, पुणे, एम. आय. डी. सी. यांचे पासची आवश्यकता असणार नाही.

(विक्रम कुमार)
महापालिका आयुक्त
पुणे महानगरपालिका, पुणे

MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF POONA
पुणे म्युनिसिपल कॉर्पोरेशन सन-१९५०
EST.1950

सोबत : वाहन परवाना प्रपत्र

# वाहन परवाना

याद्वारे प्रमाणीत करण्यात येते की, खालील कर्मचारी आमचे कंपनीमध्ये कामास असून सदर परवाना कंपनीमध्ये येणे व जाणे करिता देण्यात येत आहे.

१) कर्मचा-याचे नांव -
   पत्ता -
   मोबाईल क्रमांक -

२) कर्मचा-याचा आय डी क्रमांक –

३) वाहन क्रमांक –

४) कोठून कोठे -

५) कामाची वेळ -

६) सदरचा पास दिनांक १४ जूलै २०२० ते २३ जुलै २०२० पर्यंत वैध राहील.

या कार्यालयाचे आदेश क्रमांक जा.क्र.मआ/साप्रवि/२३६१ दि. १२/०७/२०२० नुसार आपणास सदरची परवानगी कंपनीमध्ये येणे व जाणे या करिता देण्यात आलेली असून सदर पासचा दुरुपयोग झाल्यास सदरचा पास तात्काळ रद्द करण्यात येईल.

सही /-
एच आर. / मॅनेजर चे नांव
कंपनी
हुद्दा व शिक्का